दि: 11/09/2023

प्रजावाणी

# घरफोडी करणाऱ्यास अटक

## साडेसात लाखांचा ऐवज जप्त

नांदेड, दि. १० : जिल्ह्यात घरफोडी करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी बिलोली टोलनाक्याजवळ सापळा रचून पकडले. आरोपीने चार घरफोड्या केल्याचे पोलीस तपासात उघड झाले असून जवळपास साडेसात लाख रुपयांचा मुद्देमाल आरोपीकडून जप्त करण्यात आला आहे.

जिल्ह्यात घरफोडी करणारा आरोपी बिलोली टोलनाक्याजवळ येत असल्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर तेथे एलसीबीने सापळा रचून अमरीश उर्फ अमऱ्या दुर्गा काळे (वय ४५, दगडपूर, ता. बिलोली) याला ताब्यात घेतले. पोलिसांनी अधिक तपास केला असता घरफोडी केल्याचे त्याने कबुल केले. नांदेड ग्रामीण, उस्माननगर, मुखेड आदी पोलीस स्टेशनमध्ये आरोपीवर गुन्हे दाखल आहेत. आमऱ्या काळे या आरोपीकडून घरफोडीतील चोरी केलेले ११३ ग्रॅम दागीने ज्याची एकूण किंमत पावणेसात लाख रुपये आहे. ते हस्तगत करण्यात आले. सदर आरोपी हा सोलापूर जिल्ह्यातील खून व दरोड्यातील गुन्हेगार असून फरार होता. पुढील कारवाईसाठी आरोपीला ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अ.पो.अ. अबिनाश कुमार, अ. पो. अ. खंडेराव धरणे, पो. नि. द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि रवी वाहुळे, सपोनि पांडूरंग माने, पोउपनि सचिन सोनवणे व पोलीस कर्मचाऱ्यांनी केली.

लोकपत्र दि: 11/09/2023

# घरफोडी प्रकरणातील आरोपीस अटक

## नांदेड ग्रामीण, उस्माननगर, मुखेड, नायगाव ठाण्यातील चार गुन्हे उघड

### ६ लाख ७८ हजाराचा मुद्देमाल जप्त

नांदेड/प्रतिनिधी

...देड शहरातील विविध ठाण्यात ...डी प्रकरणातील आरोपीस ...क गुन्हे शाखेच्या पथकाने ...ली येथे सापळा रचून अटक ...त्याच्याकडून ६ लाख ७८ ...रुपयाचा मुद्देमाल जप्त ...आहे. सदरील आरोपीने ...ग्रामीण, उस्माननगर, ...नायगाव पोलीस ...हद्दित चोरीचे गुन्हे ...कबुली दिली आहे.

...प्रकरणातील आरोपी ...येत असल्याची गुप्त ...ताच स्थानिक गुन्हे ...पथकाने वरिष्ठांच्या ...बिलोली येथील ...परिसरात सापळा



लावून आरोपी अमरीष उर्फ अमऱ्या दुर्गा काळे रा.जेवुर ता.अक्कलकोट जि.सोलापुर यास ताब्यात घेवून विचारपूस केली असता त्याने नांदेड ग्रामीण, उस्माननगर, मुखेड, नायगाव या चार ठाण्याच्या हद्दित गुन्हे केल्याचे कबुल केले. आरोपीकडून पोलिसांनी घरफोडीतील चोरी केलेले ११३ ग्राम दागिणे ज्याची किंमत ६ लाख ७८ हजार रूपये असा माल हस्तगत केला आहे. आरोपीस पुढील तपासासाठी ग्रामीण पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदरील कारवाई पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, स्थागुशाचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे सहायक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे, सपोनी पाडुरंग माने, पोउपनि सचिन सोनवणे, पोहेकॉ गुंडेराव करले, पोना संजु जिंकलवाड, देवा चव्हाण, बालाजी यादगिरवार, ज्वालासिंघ बावरी, रणवीर राजवंशी, गजानन बैनवाड आदींनी पार पाडली.